| MHPU180007892015 | लताबाई गाढवे<br>विरूध्द<br>बबन दोरगे व इ. |
|---|---|

## निशाणी क्र.११४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये मयत प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे ह्या दिनांक २१.०४.२०२१ रोजी मरण पावल्या. त्यांचे वारस अभिलेखावर समाविष्ट करणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे यांना 'प्रतिवादी क्र.५अ) अनिता लक्ष्मण शिंदे, वय–५३ वर्षे, प्रतिवादी क्र.५ब) शशिकला नंदकुमार गायकवाड, वय–५१ वर्षे, प्रतिवादी क्र.५क) आशा राजेंद्र जाधव, वय–४७ वर्षे, प्रतिवादी क्र.५ड) उज्वला महादेव मेमाने, वय–४५ वर्षे, प्रतिवादी क्र.५इ) मालन निलेश पवार, वय–४२ वर्षे, प्रतिवादी क्र.५ई) गणेश महादेव मेमाने, वय–३९ वर्षे, सर्व रा. श्री. गणेश नगर, २/३५, येरवडा, पुणे' हे वारस असुन त्यांना अभीलेखावर घेण्यासाठी सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांचे म्हणणेनुसार न्यायास अनुसरून योग्य ते आदेश करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले आणि कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा जाहीर ठराव, निरंतर मनाई, ताबा व कायदेशीर वाटपपत्राचा आणि पोकळीस्त खरेदीखत तसेच, पोकळीस्त हक्कसोडपत्र रद्द होण्याकरीता असल्याने मयत प्रतिवादी क्र.५ यांचे वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. प्रकरणातील दाव्याचे स्वरुप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा–या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जातील मयत प्रतिवादी क्र.५ यांचे वारसांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणार आहे. करीता, मी खालील आदेश परीत करतो –

## आदेश

१. निशाणी ११४ वरील अर्ज रू.५००/– खर्च लावून मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला आदेशित करण्यात येते की, अर्जातील नमुद मयत प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे यांचे वारस 'प्रतिवादी क्र.५अ) अनिता लक्ष्मण शिंदे, वय–५३ वर्षे, प्रतिवादी क्र.५ब) शशिकला नंदकुमार गायकवाड, वय–५१ वर्षे, प्रतिवादी क्र.५क) आशा राजेंद्र जाधव, वय–४७ वर्षे, प्रतिवादी क्र.५ड) उज्वला महादेव मेमाने, वय–४५ वर्षे, प्रतिवादी क्र.५इ) मालन निलेश पवार, वय–४२ वर्षे, प्रतिवादी क्र.५ई) गणेश महादेव मेमाने, वय–३९ वर्षे, सर्व रा. श्री. गणेश नगर, २/३५, येरवडा, पुणे' यांना पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर घ्यावे.

३. वादीने येणेप्रमाणे दाव्यात पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत प्रकरणात दाखल करावी.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.31 17:43:24 +0530

ठिकाणः दौंड,
दिनांक ३०/०७/२०२६

**(एस.एन. पाटील)**
२रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, ता.दौंड, जि.पुणे